मा.श्री. गोकुळ मवारे, माप्रसे, जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२.११.२०१० रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त ( स्थळ – जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे )

---

समेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे व उपस्थितांचे स्वागत करुन त्यांचे परवानगीने समेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर औ.संघटनांचे पदाधिकारी यांनी धुळे येथे नव्यानेच मऔविमचे विभागीय कार्यालय सुरु झाल्यामुळे विभागीय अधिकारी श्री अरुण आनंदकर यांचे अभिनंदन केले. तसेच लघुउद्योग भारती शहर अध्यक्ष म्हणुन नव्यानेच नियुक्त झालेले श्री देवेंद्रसींग राजपुत व त्यांचे सहकारी यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करण्यांत आले.

सभेसाठी बहुतेक कार्यालय प्रमुख गैरहजर असल्याचे मा.अध्यक्षांच्या निर्दशनास आले. तसेच प्रतिनिधींकडे त्रोटक माहिती असल्याने यापुढे कार्यालयीन प्रमुख बैठकीस हजर राहतील याची काळजी सदस्य सचिवांनी घ्यावी तदनंतरही कार्यालय प्रमुख सभेस गैरहजर राहिल्यास सदरील बाब त्यांच्या वरिष्ठांच्या निदर्शनास आणुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल असे आदेश सभा सुरु होण्यापुर्वीच मा.अध्यक्ष यांनी दिली.

| अ. क्र. | विषय | सभेतील चर्चा | सबंधीत विभाग |
|---|---|---|---|
| १ | मागील सभा दिनांक १८.०६.२०१० रोजी झालेल्या झुम सभेचे इतिवृत्त मंजुर करणे | मागील दि.१८.०६.२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त पत्र क्र. २८६१-२९०९ दि २८.०६.२०१० नुसार सर्व सदस्यांना पाठविण्यांत आलेले असुन इतिवृत्तावर कोणाचाही वेगळा अभिप्राय नसल्याने सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. | |
| २ | मागील सभेच्या इतिवृत्तानुसार प्रलंबित असलेल्या मुद्यांचा आढावा घेणेबाबत | | |
| १ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीत इमारत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळणेसाठी अग्निशमन एनओसीची सक्ती केली जाते. सदर बाब खर्चिक व वेळ खाऊ असल्याने त्या बाबत पुर्नविचार व्हावा- डीमा धुळे | सदर बाब धोरणात्मक असुन उद्योग संचालनालय व मऔविम मुंबई स्तरावर चर्चा सुरु असुन लवकरच निर्णय होईल असे मा.विकास आयुक्त (उद्योग) यांनी सांगितले होते. अद्याप काही निर्णय झालेला नसल्यामुळे विषय वगळण्यात यावा असे सदस्य सचिव यांनी सांगितले. | जिउकें धुळे |
| २ | धुळे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहती मध्ये पाणी पुरवठा पुर्ण वेळ व पुर्ण दावाने होत नाही, तो नियमीत व्हावा व पाणी शुद्धीकरण दररोज नियमीत करुन पुरवठा व्हावा व डी झोन मधील सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था करावी तसेच नविन टाकी होणे आवश्यक आहे – डामा / खांदेश औविप धुळे | नविन पाण्याची टाकी, नविन पाईपलाईन, नविन फिडर इ. प्रस्तावांना अद्याप मंजुरी मिळाली नसल्याचे मऔविमच्या उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले. सभेस का.अ. मऔविम उपस्थित नसल्यामुळे सर्वांनी नाराजी व्यक्त केली. या बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले की, का.अ. मऔविम यांनी वरिष्ठांकडे पाठपुरावा करुन सदर कामे कोणत्याही परिस्थितीत ३०.११.२०१० पुर्वी करुन घ्यावीत. | का.अ. मऔविम धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | सध्या मऔविम मध्ये उपलब्ध असलेले भुखंड, त्यांची मागणी व विहीत मुदतीत बांधकाम पुर्ण न केलेल्या घटक त्यांना भुखंड परत घेण्याची नोटीस पाठवली आहे त्या बाबत सध्याची स्थिती | प्रा.अ.मऔविम यांनी सांगितले की, एकुण १३७ घटकांना नोटीसा दिल्याअसुन ६ पंचनामे केले आहेत. भुखंड ताब्यात घेण्यासाठी कायदेशिर बाबींची पुर्तता करुन मे २०१० पुर्वी संपुर्ण कार्यवाही जाईल. या बाबत सविस्तर चर्चा होवुन रिक्त भुखंडाच्या याद्या दर तिमाहीला सर्व संघटनांच्या पदाधिका-यांना देण्याची व्यवस्था मऔविमने करावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ मऔविम धुळे |
| ४ | धुळे मऔविम क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत - लघुउद्योग भारती | मऔविम क्षेत्रातील टप-या धारकांचे पुर्नवसनासाठी परिसरात कमीत कमी जागा / भुखंड उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही मऔविमने तात्काळ करावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ मऔविम धुळे |
| ५ | धुळे मऔविम वसाहत क्षेत्रात नविन भुखंड उपलब्ध करणे बाबत - सर्व संघटना | अतिरिक्त मऔविम क्षेत्र शेजारी रावेर गावाच्या परिसरातील ६०० हेक्टर भु-संपादन प्रस्ताव उपविभागीय कार्यालयाकडे प्राप्त असुन भुखंड ताब्यात घेण्याबाबत येत असलेल्या अडचणी उपविभागीय अधिकारी यांनी सभागृहात सविस्तर सांगितल्या. या बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले की, जेवढे क्षेत्र तात्काळ ताब्यात घेणे शक्य आहे त्यावर ३०.११.२०१० पुर्वी पुढील कार्यवाही करावी. | उप विभागीय अधिकारी धुळे |
| ६ | जिल्हयातील मऔविम वसाहतीतील महावितरण ने झोन निहाय कोणत्या एरियात कोणत्या डीपीवर किती लोड शिल्लक आहे त्याचा तपशिल मिळावा - लघुउद्योग भारती | मऔविम क्षेत्रात शिल्लक असलेला लोडची झोननिहाय यादी महावितरणने अद्याप संघटनांना दिली नसल्याचे व कपंनीच्या संकेतस्थळावर अद्ययावत माहिती केली नसल्याचे सांगितले. यावर सविस्तर चर्चा होवुन शिल्लक लोडची यादी दिनांक ०३.११.२०१० ला सकाळी ११ वाजता जिउकें धुळे यांचेकडे द्यावी व जिउकेंने ती सर्व संघटनांना हस्तांतरीत करावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | अ.अ. महावितरण धुळे |
| ७ | धुळे शहरातील पारोळा रोड परिसरातील लघु उद्योग घटकांना अखंडीत विजपुरवठा मिळणे बाबत - लघु उद्योग भारती | यासाठी ४ डीपी व २६ पोल मंजुरीसाठी पाठवलेल्या प्रस्तावास महावितरणच्या वरिष्ठ कार्यालयाकडुन मंजुरी नसल्याचे उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले. याबाबत अ.अ.महावितरण यांनी तात्काळ कार्यवाही करुन दिनांक ३०.११.२०१० पुर्वी अखंडीत विज पुरवठा सुरु करावा. | अ अ महातिवरण धुळे |
| ८ | सामुहिक प्रोत्साहन योजना २००१ व २००७ अंतर्गत दिल्या जाणा-या विद्युतकर सुट सवलत देण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर देणे बाबत कार्यवाही व्हावी | मागील सभेत मा.विकास आयुक्त (उद्योग) मुंबई यांनी सांगितल्या प्रमाणे सदर बाब धोरणात्मक असुन राज्य उद्योग मित्र स्तरावर या बाबत कार्यवाही होणार असल्यामुळे सदर विषय वगळण्यात यावा असे सदस्य सचिव यांनी सांगितले. | जिउकें धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | मुंबई-आग्रा महामार्गावरील जकात नाका औद्योगिक वसाहतीच्या जवळ असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होते महापालीकेने त्यावर कार्यवाही करुन मुख्य रस्त्याच्या वाहतुकीला अडथळा येणार नाही अशा ठिकाणी जकातनाका हलवावा-डामा धुळे | सध्या ज्या ठिकाणी जकात नाका आहे, तेथे वाहतुकीसाठी अडथळा येणार नाही काळजी घेण्यासाठी उपस्थित प्रतिनिधीने मा आयुक्त मनपा यांचेशी चर्चाकरुन अहवाल सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | आयुक्त मनपा धुळे |
| १० | मे महाराष्ट्र ऑईल एक्स्ट्रॅक्शन लि, ई-१४० एमआयडीसी धुळे या घटकाकडुन होत असलेल्या प्रदुषणा बाबत | सदर घटकाच्या प्रदुषणाबाबत अहवाल प्राप्त झाला असुन घटकास शोकॉज नोटीस बजावली असल्याचे उपस्थित प्रतिनिधीने सांगितले. उपप्रादेशिक अधिकारी उपस्थित नसल्यामुळे मा.अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. या बाबत दिनांक ३०.११.२०१० पुर्वी कार्यवाही करुन अंतिम अहवाल सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उप प्रा अ मप्रनिमं जळगांव |
| ११ | प्रदुषण न करणाऱ्या घटकांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे पासुन सुट देण्यात यावी - सर्व संघटना | सदर बाब धोरणात्मक असुन याबाबत काही पत्र व्यवहार झाला असल्यास पुढील सभेपुर्वी अनुपालन सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उप प्रा अ मप्रनिमं जळगांव |
| १२ | नरडाणा ग्रोथ सेंटरच्या विकासा साठी शासनाच्या नविन योजना उपलब्ध करुन द्याव्यात-डीमा धुळे | नरडाणा ग्रोथसेंटरच्या विकासासाठी वेगळ्या अशा योजना सध्या तरी कार्यान्वित नाहीत. परंतु शासनाने दिनांक ३१.०७.१० च्या शा.नि.व्दारे आयपीएस अनुदानात दुप्पट वाढ व ५ टक्के व्याज अनुदान इ.सवलती मंजुर केल्या आहेत. लवकरच राज्याचे कृषि उद्योग धोरण २०१० जाहीर होत असल्यामुळे नरडाणा ग्रोथसेंटर मधील उद्योजकांना निश्चीत फायदा होईल. सध्यस्थितीत सदर विषय वगळण्यात यावे, असे सदस्य सचिव यांनी सांगितले. | जिउकें धुळे |
| १३ | शेतीवर आधारीत उद्योगांकरीता शासनाने प्रशिक्षण व विशेष अर्थ सहाय्य देणे बाबत विचार व्हावा-डीमा धुळे | जिल्हा नियोजन मंडळा मार्फत उद्योजकता प्रशिक्षणासाठी प्राप्त होत असलेल्या तरतुदीमध्ये सन २०१०-११ मध्ये जास्तीत जास्त शेतीपुरक उद्योगांवर आधारीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यांत आले असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होवुन अंध, अपंग, मतिमंद बेरोजगारांना प्रशिक्षण देणे शक्य असुन याबाबत श्री नितीन बंग यांचेशी चर्चा करुन प्र.अ.एमसीईडी यांनी कार्यक्रमांचे नियोजन करावे असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्र.अ. एमसीईडी धुळे |
| १४ | सामुहिक प्रोत्साहन योजना २००१ अंतर्गत सर्व घटकांना विशेष सामुहिक प्रोत्साहन एकाच वेळी रोख स्वरुपात मिळावे- डामा / डीमा धुळे | साप्रोयो-२००१ अंतर्गत जिउकेंकडे आता फारसे प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबीत नाहीत, तसेच सध्या पात्र घटकांच्या हफ्त्यांचे अनुदानाचे वितरण तात्काळ होत आहे. सदर बाब धोरणात्मक असुन विषय वगळण्यात यावा असे सदस्य सचिव यांनी सांगितले. | जिउकें धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | महाराष्ट्रातील लघु उद्योग बंद पडण्याचे प्रमाण वाढत चालले आहे, त्यावरुन त्यांचा वाचविण्या साठी उद्योग संचालनालयाने वेगळा विचार करावा- डीमा धुळे | बंद घटकांबाबत ठाणे औरंगाबाद पुणे नाशिक येथे नमुना स्टडी सुरु असुन बंद घटकाची गुंतलेली जागा नविन उद्योजकाला हस्तांतरीत अशी करता येईल या बाबत कार्यवाही सुरु असल्याचे मागच्या सभेत मा.विकास आयुक्त (उद्योग) यांनी सांगितले होते. या बाबत अद्याप काहीही निर्णय झालेला नसल्याने विषय वगळण्यात यावा असे सदस्य सचिव यांनी सांगितले. | जिउके धुळे |
| १६ | नाशिक महसुल आयुक्तांचे अध्यक्षतेखाली धुळे नंदुरबार जळगांव जिल्हयाची स्वतंत्र सभा आयोजना बाबत | सदस्य सचिव यांनी सांगितले की, सदर बाब मा उद्योग सह संचालक नाशिक यांचे निदर्शनास आणुन दिली आहे. तसेच मा.अध्यक्ष यांनी सांगितले की, आयुक्तांचे अध्यक्षतेखाली धुळे नंदुरबार जळगांव जिल्हयासाठी सभेचे आयोजन करण्यांत येईल. | |
| १७ | ईएसआय दवाखाना एमआयडीसी धुळे – खांदेश औविम | एमआयडीसीतील काही कामगारांना उपचारासाठी शहरातील ईएसआय दवाखान्यात यावे लागते. या बाबत ईएसआयने शहरातील व मऔविम क्षेत्रातील कामगार सभासदांच्या स्वतंत्र याद्या करुन मऔविम क्षेत्रातील रुग्नावर तेथेच उपचार करावेत असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | |
| १८ | ईएसआयचा फायदा घेतलेल्या सभासदांसाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था होणे बाबत- खांदेश औविम | ईएसआय सभासदांसाठी शासकीय रुग्नालयात खाटा राखीव ठेवण्यांत आल्या आहेत असे ईएसआय यांचे म्हणणे आहे, पण प्रत्यक्षात खाटा राखीव नसल्याचे औ.संघटनांचे पदाधिकारी यांचे म्हणणे आहे. या बाबत कोणत्या वार्डात किती खाटा राखीव आहे याचा तपशिल मा.अध्यक्ष यांना सादर करावा. | ईएसआय धुळे |
| १९ | मे.किरण लॅब प्लास्ट, ए-३ उद्योगनगर सह संस्था – घटका समोरील अतिक्रमणा बाबत | सदर विषय ब-याच कालावधी पासुन प्रलंबीत असल्याने मा.अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. सदर अतिक्रमण दिनांक ३०.११.२०१० पुर्वी काढुन संबधितांनी अनुपालन मा.अध्यक्ष यांना सादर करणे बाबत सुचीत केले. अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस विभागाची मदत लागत असल्यास संबंधीत कार्यालयाने त्यांचेशी प्रत्यक्ष संपर्क करावा असे सुचीत केले. | का अ मंडल सार्व बांधकाम विभाग नं.११ धुळे / मा राधि राष्ट्रीय राजमार्ग प्राधि करण नाशिक |
| २० | ए-१० मुखंडावरील अतिक्रमण काढुन मुखंड हस्तांतरण करुन मिळणे बाबत- अध्यक्ष उद्योगनगर सह संस्था धुळे - | सदर मुखंडावर पक्के बांधकाम होवुन अतिक्रमण झालेले आहे, मुखंड एमआयडीसीच्या पाणीपुरवठा विभागाच्या ताब्यात आहे, तो उद्योगनगर संस्थेला मिळावा अशी संस्थेची मागणी आहे. या बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले की, हस्तांतरणाची कार्यवाही प्रा अ मऔविम धुळे यांनी तर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही का अ मऔविम यांनी दिनांक ३०.११.२०१० पुर्वी करावी. अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस विभागाची मदत लागत असल्यास त्यांचेशी प्रत्यक्ष संपर्क करावा असे सुचीत केले. | प्रा अ / का अ एमआयडी सी धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | छोटया ट्रॅक्टर ट्रेलर उत्पादनावर ४ टक्के व मोठया ट्रॅक्टर ट्रेलरवर १२.५ टक्के टॅक्स लावला जातो, तो शेतकरी देत नाही, पर्यायाने उद्योजकाच्या व्यवसायावर परिणाम होतो, सेल टॅक्स विभागाने ५ टक्के वॅट आकारुन नियमाप्रमाणे टायरचे बिलावर मिळणारा वॅट टॅक्स सेट ऑफ मिळावा. सदर बाबत शेती उपयोगी या सदरात मोडत असल्याने विक्रीकर विभागाने वाणीज्य वापर गृहीत न धरता शेती वापर गृहीत धरुन व्हॅटची आकारणी करावी. | विक्रीकर कार्यालयाच्या प्रतिनिधीने सांगितले की, शेती पुरक उत्पादनावर ४ टक्के टॅक्स लावला जातो शेती व्यतिरिक्त इतर उत्पादनावर १२.५ टक्के टॅक्स लावला जातो, यात बदल करण्यासाठी वित्त विभागाची परवानगी लागते. याबाबत सविस्तर चर्चा होवुन धोरणात्मक बाब म्हणुन सदर विषय वगळण्यात यावा असे ठरले. | जिउकें धुळे |

आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करणे -

एमआयडीसी बाहेरील उद्योग घटकांना एक्सप्रेस फिडर वरुन विज पुरवठा करणे बाबत – या बाबत अधिक्षक अभियंता महावितरण धुळे यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले.

तदनंतर श्री आनंदकर प्रादेशिक अधिकारी मऔविम धुळे यांनी धुळे जिल्हयात येत असलेल्या डीएमआयसी प्रकल्पाबाबत थोडक्यात माहिती दिली. डीएमआयसी व एमआयडीसी यांनी एकत्र येवुन एक कार्पोरेशन स्थापन केलेले आहे. .त्या मार्फत जमिनी ताब्यात घेवुन त्या विकसीत करुन उद्योजकांना वाटप केल्या जातील. .त्यात वेगवेगळे झोन असतील, उद्योजकांना / कामगारांना त्या क्षेत्रातच राहण्याच्या सोई असतील, असे सांगितले.

मा.अध्यक्ष यांनी सदर प्रकल्पा मध्ये धुळे जिल्हयातील उद्योजकांनी जास्तीत जास्त नविन उद्योग सुरु करण्यासाठी सहभागी व्हावे, त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्यांत येईल असे आवाहन केले

शेवटी सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्ष व उपस्थित सदस्यांना दिपावलीच्या शुभेच्छा देवुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सही /-
महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
मा.अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी धुळे

मा.श्री. गोकुळ मवारे, भाप्रसे, जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२.११.२०१० रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र, स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य, आजारी उद्योग पुनरुज्जीवन समिती सभेस उपस्थित सदस्य ( स्थळ – जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे )

मा.सर्वश्री

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.गोकुळ मवारे, भाप्रसे, जिल्हाधिकारी धुळे | अध्यक्ष |
| २. | अरुण आनंदकर प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी धुळे | सदस्य |
| ३. | टी डी हुळवले उपविभागीय अधिकारी धुळे | |
| ४. | आर सी रामोळे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी धुळे | |
| ५. | आर पी मदाणे अग्रणी जिल्हा प्रबंधक सेंट्रल बँक ऑफ इंडिया धुळे | |
| ६. | ए ओ मोरे, प्रतिनिधी जिल्हा व्य शि व प्र कार्यालय धुळे | |
| ७. | विवेक सोनवणे, अध्यक्ष डामा धुळे | |
| ८. | नितीन देवरे, सचिव डामा धुळे | |
| ९. | मनेष थोरात सहसचिव लघु उद्योग भारती धुळे शहर | |
| १०. | संजय बागुल, सचिव, लघु उद्योग भारती धुळे शहर | |
| ११. | एन ए देवराज, सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य धुळे | |
| १२. | टी डी बडगुजर उपअभियंता मऔविम धुळे | |
| १३. | उमेश महाजन, अध्यक्ष अ.भा.म.फु.समता परिषद धुळे | |
| १४. | टी ए ठाकरे क्षेत्र अधिकारी मप्रनिमंडळ जळगांव | |
| १५. | एन व्ही सोनार, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र धुळे | |
| १६. | एस एम दलाल, व्यवस्थापक महावित्त धुळे | |
| १७. | कमलेश चौधरी, अध्यक्ष, भारतीय जनता युवामोर्चा धुळे | |
| १८. | वी पी अग्रवाल विक्रीकर अधिकारी धुळे | |
| १९. | एस पी कोठावदे नगररचनाकार धुळे | |
| २०. | मा सु ढेपे, सहायक रचनाकार धुळे | |
| २१. | सुभाष कांकरीया, लघु उद्योग भारती धुळे | |
| २२. | सी डी भारुळे क्षेत्र व्यवस्थापक मऔविम धुळे | |
| २३. | नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औ विकास परिषद धुळे | |
| २४. | आशिष के पाटील, अध्यक्ष उद्योगनगर सहकारी संस्था धुळे | |
| २५. | प्रशांत मोराणकर, उपाध्यक्ष, लघु उद्योग भारती धुळे | |
| २६. | देवेंद्रसींग राजपुत, अध्यक्ष, लघु उद्योगभारती, सदस्य आजारी उद्योग पुर्नवसन | |
| २७. | सौ मिना सातभाई, प्रकल्प अधिकारी धुळे मनपा | |
| २८. | अधिक्षक अभियंता, महावितरण कं धुळे | |
| २९. | पी पी काकडे, उपअभियंता, महावितरण कं धुळे | |
| २९. | प्रशांत पाटील, प्रकल्प अधिकारी एमसीईडी धुळे | |
| ३०. | अमोल पाध्ये, प्रकल्प अधिकारी मिटकॉन धुळे | |
| ३१. | एस ए परचंडे व्यवस्थापक जिउकें धुळे | |
| ३२. | सतिश भामरे, महाव्यवस्थापक जिउकें धुळे | सदस्य सचिव |